ePaper

| वर्ष - 7 | अंक -48 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दि. 14 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# महाराष्ट्र भाजपमुक्त करण्याचा निर्धार: नाना पटोले



## आतील पानांत

- पुणेकरांच्या जीवाशी खेळ!
- पालखी सोहळ्यानिमित्त पुढील ३ दिवस वाहतुकीत बदल
- ‘सीएमई’ हद्दीतील सांडपाणी प्रकल्पाला संरक्षण विभागाचा ‘हिरवा कंदील’!


# ‘पुणे-मुंबई एक्सप्रेसवे’वर टँकरला भीषण आग!

## कुणेगाव पुलावरील दुर्घटना : 4 जणांचा मृत्यू, तीनजण गंभीर जखमी

### महामार्गावर दुतर्फा मोठी वाहतूक कोंडी

। लोणावळा । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे-मुंबई एक्सप्रेसवेवर एका केमिकलच्या टँकरला अपघातानंतर आग लागली. या आगीत चार जणांचा होरपळून मृत्यू झाला. तर तीनजण गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना लोणावळ्यातील कुणेगाव पुलावर घडली.**



संबंधित अपघातग्रस्त टँकर ज्वलनशील केमिकल घेऊन मुंबईच्या दिशेने जात होता. सकाळी 11.35 वाजताच्या सुमारास कुणेगाव पुलावर पलटी झाला. त्यानंतर टँकरने पेट घेतला. या टँकरमध्ये तीन जण असल्याचे समजते. त्यातील दोन जणांचा मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. हा टँकर ज्या पुलावर पलटी झाला त्यावेळी पुलाखालून जाणाऱ्या रस्त्यावरून तिघेजण दुचाकीवरून चालले होते. या टँकरमधील पेटते केमिकल त्यांच्या अंगावर पडल्याने ते गंभीर जखमी झाले होते. त्यापैकी दोघांचा मृत्यू झाला, तर एक स्त्री गंभीर जखमी असल्याचे सांगण्यात येत आहे.

याशिवाय पुलाखाली आणखी ही दोन ते तीन गाड्या उभ्या होत्या. त्यादेखील जळल्या आहे, मात्र सुदैवाने त्या गाड्यांमध्ये कोणीही नव्हते. सदर घटनेची माहिती मिळताच आयआरबी, लोणावळा नगरपरिषद, खोपोली नगरपरिषद, आयएनएस शिवाजी यांचे अग्निशमन वाहन घटनास्थळी दाखल झाले आणि बचाव कार्य सुरू केले.

### टँकरमध्ये दोन ते तीन वेळा स्फोट

आयएनएस शिवाजीच्या अग्निशमन वाहनातून फोमचा वापर करून साधारण 12.45 वाजताच्या सुमारास ही आग आटोक्यात आणण्यात आली. मात्र दरम्यान या टँकरमध्ये दोन ते तीन वेळा स्फोट झाले. हे सर्व सुरू असताना एक्सप्रेस हायवेवर दुतर्फा मोठ्या प्रमाणावर वाहतूक ठप्प झाली होती.

# विद्यार्थी वारकऱ्यांनी दिला ज्ञानेश्वर माऊलींना निरोप!

## महापुरुषांचा वैचारिक वारसा जपण्याचा संदेश; राजमाता जिजाऊ महाविद्यालयाची संकल्पना

। पिंपरी। महाईन्यूज



**पंढरीच्या विठ्ठल भेटीची आस लागलेला जगद्गुरु संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा भक्तीमय वातावरणात पंढरपुरकडे मार्गस्थ झाला. या पवित्र पालखी सोहळ्याचे दर्शन आणि निरोप घेण्यासाठी भोसरी लांडेवाडीतील राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाच्या महाविद्यालयातील विद्यार्थी वारकऱ्यांनी ऐतिहासिक वेशभूषा परिधान करुन भोसरी ते दिघीतील मॅगझीन चौक पायी वारी केली.**

महापुरुषांच्या विचारांचा वारसा जपण्याचा संदेश देत विद्यार्थ्यांची दिंडी आज सकाळी पावणे नऊच्या सुमारास दरमजल करत लांडेवाडी, पीसीएमटी चौक, गव्हाणे वस्ती मार्गे मॅगझीन चौकात पोहोचली. ज्ञानेश्वर माऊली... विठ्ठल विठ्ठल.. हरिनामाचा हो.. असा नामघोष करत विद्यार्थी वारकरी विठ्ठलभक्तीने तल्लीन झाले होते. माऊलींच्या पादुकांचे मनोभावे दर्शन घेण्याची त्यांना ओढ लागली होती.

### विद्यार्थ्यांसह यांची उपस्थिती...

**यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा भोसरीचे माजी आमदार विलास लांडे, खजिनदार अजित गव्हाणे, सल्लागार विक्रांत लांडे, सचिव सुधीर मुंगसे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पाटील, उपप्राचार्य प्रा. किरण चौधरी, डॉ. नेहा बोरसे, प्राचार्या डॉ. श्रेया दाणी, रजिस्ट्रार अश्विनी भोसले, डॉ. गणेश चव्हाण, प्रा. गोपीचंद करंडे व विद्यार्थी उपस्थित होते.**

# पुणेकरांच्या जीवाशी खेळ!

## » रस्त्यावर संकटाची टांगती तलवार, शहरभर होर्डिंगचा सुळसुळाट

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे-नगर महामार्गावर रस्त्याच्या दोन्ही बाजूने होर्डिंगचे साम्राज्य निर्माण झाले आहे. वाघोली जकातनाका ते रांजणगाव दरम्यान दोन्ही बाजूने २६४ होर्डिंग उभारण्यात आल्याचे दिसून आले. या होर्डिंगवर कोणाचेही नियंत्रण नसल्यामुळे दिवसेंदिवस ही संख्या वाढत चालली आहे. पिंपरी-चिंचवडसह पुणे शहर आणि जिल्ह्याच्या हद्दीत गेल्या काही दिवसांत होर्डिंग पडून दुर्घटना घडल्या आहेत. पुण्यातील सर्व महामार्गांवर दोन्ही बाजूस होर्डिंगचे लोण वेगाने पसरत असून, महापालिकांच्या हद्दीबाहेर होर्डिंग उभारण्यासाठी सध्या तरी कोणाचीही परवानगी घेण्याची गरज नाही. त्यामुळे महामार्गापासून, रहिवासी-व्यवसायी क्षेत्राच्या आजूबाजूला सर्व नियम धाब्यावर बसवून होर्डिंग उभारली जात आहेत.**




किवळ्यात पाच नागरिकांना नाहक मृत्यू झाल्यानंतर जागे झालेले प्रशासन पुन्हा जीव जाण्याची वाट पाहत आहे का?

पुणे-नगर महामार्गावर रस्त्याच्या दोन्ही बाजूने होर्डिंगचे साम्राज्य निर्माण झाले आहे. वाघोली जकातनाका ते रांजणगाव दरम्यान दोन्ही बाजूने २६४ होर्डिंग उभारण्यात आल्याचे दिसून आले. या होर्डिंगवर कोणाचेही नियंत्रण नसल्यामुळे दिवसेंदिवस ही संख्या वाढत चालली आहे.

पुणे-नगर महामार्गावरील वाघोली जकातनाका ते रांजणगाव दरम्यान रस्त्याची पाहणी करण्यात आली. या वेळी रस्त्याच्या दोन्ही बाजूने मोठमोठे होर्डिंग उभारल्याचे दिसून आले. वाघोली जकात नाका ते लोणीकंददरम्यान पाच ते सहा किलोमीटर दरम्यान १३१ होर्डिंग असल्याचे दिसून आले. वाघोलीमध्ये प्रत्येक चौकात व महामार्गलगच्या काही इमारतींवरदेखील होर्डिंग उभारण्यात आले आहेत.

होर्डिंग उभे करताना लोखंडी सांगाड्यावर सिमेंट कॉंक्रिटीकरण केले नसल्याचे दिसून आले. काही होर्डिंग रस्त्याला लागून उभारण्यात आले आहेत. त्यामुळे होर्डिंग रस्त्यावर पडल्यास मोठी दुर्घटना घडू शकते. वाघोलीनंतर लोणीकंद, कोरेगाव भीमा, सणसवाडी, शिक्रापूर, रांजणगाव या गावांलगत रस्त्यांच्या कडेला मोठमोठे होर्डिंग उभारण्यात आले आहेत. काही महत्त्वाच्या वळणांवर मोठे होर्डिंग लावण्यात आले असून, त्यावर कोणाचेही नियंत्रण नसल्याने ही संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. महामार्गावर अनेक ठिकाणी होर्डिंग लावण्यात आली आहेत. काही दिवसांपूर्वी जोरदार वारा आणि पाऊस झाला. त्या वेळी काही ठिकाणी झाडे आणि होर्डिंग पडले होते. सुदैवाने मोठी दुर्घटना घडली नाही. रस्त्यावर कोणाच्या अंगावर होर्डिंग पडल्यास मोठी दुर्घटना घडू शकते.

### कुठे कुठे आहेत होर्डिंग्ज

- » वाघोली जकात नाका ते रांजणगाव दरम्यान २६४ होर्डिंग
- » वाघोली जकातनाका ते लोणीकंद दरम्यान १३१ होर्डिंग
- » इमारतींवरदेखील होर्डिंग उभारल्याचे आढळून आले
- » काही होर्डिंग फूटपाथला लागून, तर काही रस्त्यापासून पाच ते दहा फूट अंतरावर
- » गावाजवळ आणि महत्त्वाच्या चौकांत सर्वाधिक होर्डिंग

# गुड न्यूजः मुंबई-पुणे प्रवास सुस्साट होणार

## » खंडाळा घाटातील रेल्वे प्रवासाबद्दल मोठी अपडेट, खंडाळ्यातून विनाब्रेक प्रवास

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे ते मुंबईदरम्यान रेल्वेने प्रवास करताना खंडाळा घाटामध्ये तीव्र उतार असल्याने गाडीचे ब्रेक तपासण्यासाठी प्रत्येक रेल्वे गाडीला खंडाळा, मंकी हिल, ठाकूरवाडी या ठिकाणी थांबा दिला जात होता. आता या ठिकाणी रेल्वे विभागाकडून 'स्पीड सेन्सिंग डिव्हाइस' (एसएसडी) बसविण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे घाटात 'एसएसडी'च्या माध्यमातून रेल्वेच्या ब्रेकवर नियंत्रण राहणार असून, गाडी प्रतितास ३० किलोमीटरने धावणार आहे. त्यामुळे प्रवाशांचा प्रवास अधिक वेगवान होणार आहे.**



### घाट क्षेत्रात यंत्रणा

देशात घाट सेक्शनमधील खंडाळा घाट हा सगळ्यात अवघड आहे. त्यामुळे या घाटात तीव्र उतार असल्याने कोणतीही हानी होऊ नये, यासाठी रेल्वे थांबवून ब्रेक तपासणी केली जात होती. त्यानंतर रेल्वे पुढे सोडली जात होती. खंडाळा घाटातून जाताना खंडाळा, मंकी हिल, ठाकूरवाडी या ठिकाणी तीव्र उतार असल्याने प्रत्येक गाडी थांबायची. आता ऑटोमोटिव्ह मशिन बसविण्यात येत असल्यामुळे या घाटात रेल्वेचा ब्रेकची आपोआप तपासणी होऊन, ती ताशी वेग ३० किलोमीटर वेगाने धावेल.

### ब्रेकवर असेल नियंत्रण

'एसएसडी'च्या माध्यमातून रेल्वेच्या ब्रेकवर नियंत्रण असणार आहे. येत्या काही महिन्यांत हे काम सुरू होणार आहे. यामुळे गाडीचा वेग जास्त असेल, तर लाल सिग्नल दिला जाईल. त्यामुळे गाडी आपोआप थांबेल. गेल्या कित्येक वर्षांपासून या घाटामध्ये रेल्वेला थांबा देण्यात येत होता. त्यामुळे वेळ जात होता. परिणामी प्रत्येक गाडीला थांबा दिल्याने रेल्वेचे दिवसातून चार ते पाच तास या घाटात वाया जात होते. परंतु, आता नव्याने बसविण्यात येणाऱ्या यंत्रणेमुळे प्रवाशांचा वेळ वाचणार आहे; तसेच मुंबईकडे जाणाऱ्या गाड्यांचा ३० मिनिटे वेळ वाचणार आहे.

मुंबई पुणे नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांना लवकरच दिलासा मिळणार आहे. एकीकडे सर्व महागाई वाढत असताना पुणे-मुंबई प्रवास स्वस्त होणार आहे. प्रवाशांसाठी राज्य परिवहन महामंडळ सुरु करत असलेल्या नव्या बसमधून कमी दरात प्रवास करता येणार आहे. या निर्णयामुळे नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांना चांगलाच फायदा होणार आहे. महाराष्ट्र दिनी म्हणजेच एक मेपासून ही सेवा प्रवाशांना उपलब्ध करुन देण्याचा निर्णय राज्य परिवहन महामंडळाने जाहीर केला आहे. महामंडळाच्या या निर्णयामुळे एसटी महामंडळाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढणार आहे.

### 'दुरांतो', 'वंदे भारत' विनाथांबा

**» सध्या खंडाळा घाटातून जाणाऱ्या रेल्वे गाड्यांपैकी 'दुरांतो' आणि 'वंदे भारत' या दोन गाड्या विनाथांबा जात आहेत. आता बसविण्यात येणाऱ्या 'एसएसडी' यंत्रणेमुळे भविष्यात इतरही रेल्वे गाड्या न थांबता जातील. त्यामुळे सध्या ब्रेक तपासणी करण्यासाठी प्रत्येक गाडीला लागणारा अर्धा तास वेळ वाचेल. खंडाळा घाट हा देशातील तीव्र उताराचा असलेला घाट विभाग आहे. रेल्वे बोर्डाने नव्याने आखलेल्या धोरणानुसार घाटामध्ये 'स्पीड सेन्सिंग डिव्हाइस' बसविण्याचे काम सुरू केले जाणार आहे, अशी माहिती मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. शिवराज मानसपुरे यांनी सांगितलं.**

### काय आहे योजना

एक मेपासून या शिवनेरी सेवेत एक महत्वाचा बदल करण्यात आला आहे. यामुळे एसटी महामंडळाच्या 'शिवनेरी' बसने मुंबई-पुणे दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी दिलासा मिळणार आहे. या मार्गावर इलेक्ट्रिक एसटी बस अर्थात 'ई-शिवनेरी' सुरू करण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे.

# मिशन-2024: शिरूर लोकसभा मतदार संघात

# आमदार महेश लांडगेंची वज्रमूठ!

## विधानसभा प्रमुखांसह ओझरच्या गणरायाचे दर्शन : लोकसभा मतदार संघ दौरा कार्यक्रमाचा केला शुभारंभ





भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नुकतीच लोकसभा निवडणूक प्रमुखांची घोषणा केली. त्यामध्ये शिरुर लोकसभा मतदार संघाची जबाबदारी आमदार लांडगे यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. त्यानंतर प्रथमच आमदार लांडगे यांनी श्रीक्षेत्र ओझर येथील विघ्नहर गणेश मंदिरात श्रींचे दर्शन घेतले.

यावेळी मतदार संघातील जुन्नर विधानसभा निवडणूक प्रमुख आशा बुचके, भोसरी विधानसभा निवडणूक प्रमुख विकास डोळस, हडपसर विधानसभा निवडणूक प्रमुख योगेश टिळेकर, खेड विधानसभा निवडणूक प्रमुख अतुल देशमुख, शिरुर-हवेली विधानसभा निवडणूक प्रमुख प्रदीप कंद, लोकसभा समन्वयक ॲड. धर्मेंद्र खांडरे आदी उपस्थित होते.

आमदार लांडगे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नवनियुक्त विधानसभा निवडणूक प्रमुखांची आज ओझर येथे बैठक झाली. आगामी काळात पक्ष संघटन आणि निवडणूक नियोजनाबाबत चर्चा करण्यात आली. मतदार संघनिहाय मोर्चेबांधणी करुन भाजपाच्या विचाराचा उमेदवार निवडून आणण्यासाठी एकोप्याने प्रयत्न करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

> भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शिरुर लोकसभा मतदार संघाची जबाबदारी माझ्यावर सोपवली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी भाजपा सरकारने केलेली विकासकामे आणि कल्याणकारी योजना प्रभावीपणे लोकापर्यंत पोहोचवण्यात येणार आहेत. पक्षाने दिलेला उमेदवार निवडून आणण्यासाठी आम्ही सर्व सहकारी, पदाधिकारी आणि भाजपा विचारांचे कार्यकर्ते सक्षमपणे काम करणार आहोत.
>
> **– महेश लांडगे, निवडणूक प्रमुख, शिरूर लोकसभा, भाजपा.**

---

# रॉयल ऑरेंज काऊंटी सोसायटीतील चिमुरड्यांनी लुटला बालपणीच्या खेळांचा आनंद

## रहाटणीती सोसायटीमध्ये 'देसी गेम्स' कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन

| पिंपरी | महाईन्यूज

**रहाटणीतील शिवाजीनगर येथील रॉयल ऑरेंज काऊंटी सोसायटीत दि.९ आणि १० जून २०२३ रोजी बालपणीच्या जुन्या खेळांचा आनंद चिमुरड्यांना लुटला. सोसायटीमध्ये 'देसी गेम्स' कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.**

यामध्ये कंचे(मार्बल्स), लट्टू (भवरा), लगोरी, रुमालपाणी, टिपरी (हॉपस्कॉच), टायर चालवणे, स्लो सायकल, आणि बरेच काही यासारखे खेळ होते. या कार्यक्रमाचा उद्देश बालपणीच्या आठवणींना पुन्हा जोडणे आणि युवा पिढीला मैदानी खेळांचा आनंद अनुभवण्याची संधी प्रदान करणे, सौहार्दाची भावना वाढवणे आणि मोबाईल फोन आणि गॅझेट्सवरील अत्याधिक अवलंबनापासून मुक्त होणे हा होता. सोसायटी मधील नागरिकांनी सुध्दा या खेळांमध्ये सहभाग नोंदवत उत्तुंग प्रतिसाद दिला.

कार्यक्रमामध्ये लहानपणापासूनचे काही आनंददायक पदार्थ राजमलाई, पेप्सीकोला, टॉफी, स्वादिष्ट चॉकलेट्स आणि कायम लक्षात राहणारे बोरकुट सुध्दा उपलब्ध करत या आवडत्या फ्लेवर्सचा सगळ्यांनी एकत्र आस्वाद घेतला.

कार्यक्रमाच्या आयोजक कुणाल बोमनवार, रवी तीबडेवाल, शांतनू दवंडे, प्रणव कुर्थकोर्ती, नितीन गुप्ता, अभिषेक दुआ, प्रियांक गुप्ता, जैनील सेठ, प्रमोद सिंग, मोहित यांनी सर्व सोसायटीवासियांचे सहभागा बद्दल आभार मानले.







भूमिका
निलेश दुटाळ
91- 87668 40811

# सत्तार यांचे नसते उद्योग

**राज्याचे कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांची पाऊले सतत वादग्रस्त ठरताना दिसत आहेत. ज्या पदावर वसंतराव नाईक,वसंतदादा पाटील,शरद पवार,एआर अंतुले,प्रतिभाताई पाटील,मधुकरराव चौधरी आणि दिवंगत भाऊसाहेब फुंडकर यांच्यासारख्या दिग्गजांनी काम करून या खात्याचे नाव मोठे केले त्याच खात्याचे मंत्री म्हणून काम करताना अब्दुल सत्तार सतत या खात्याची इभ्रत कमी करण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत.**

त्यांनी अकोल्यात खात्यामार्फत जे धाडसत्र घडवून आणले त्याचा पुरता बोऱ्या वाजला आणि त्यासोबतच शिंदे सरकारच्या हेतूबद्दल लोकांच्या मनात संशय निर्माण करून दिला आहे. शेतकऱ्यांच्या हिताच्या गप्पा मारताना कृषी निविष्ठा उत्पादक कंपन्यांवर धाडी घालताना स्वतःची माणसे त्यात घुसविण्याचा अचाट पराक्रम अब्दुल सत्तार यांनी करून या सरकारची नाचक्की करण्यात कोणतीही कसर बाकी ठेवली नाही. सत्तार यांचे इरादे शेतकरी हिताचे असतात यावर आता कुणी भरवसा ठेवायला तयार नाही.

देवेंद्र फडणवीस यांच्या सारखा जबाबदार नेता ज्या जिल्ह्याचा पालकमंत्री आहे त्या अकोला जिल्ह्यातील व्यावसायिकांवर स्वतःची माणसे असलेली टीम तयार करून धाडसत्र राबवले जात असेल आणि सगळे व्यावसायिक त्याची तक्रार करीत असतील तर अब्दुल सत्तार यांच्या पथकाने चार दिवसात अकोल्यात खरोखर धाडी टाकल्या की हप्ते वसुलीचा प्रयत्न केला असा प्रश्न निर्माण झाला आहे. राज्यातील ४० कृषी अधिकाऱ्यांचे पथक गठीत



करून त्यात आपला स्वीय सहायक दीपक गवळी याला पाठविण्याचे नेहमीचे कसाब कृषिमंत्र्यांनी करून स्वतःचे इरादे नेक नसल्याचे दाखवून दिले आहे. बोगस बियाणे संदर्भात ज्याच्यावर गुन्हे दाखल आहेत तो हितेश भट्टड नावाचा स्थानिक व्यक्ती या पथकाला दिशानिर्देश देत होता यावरून हे तपासणी नसून वसुली पथक असल्याचा आरोप दोन आमदारांनी करून या पथकाची आणि पर्यायाने अब्दुल सत्तार यांची पोलखोल केली आहे.

हवालदिल शेतकऱ्यांचे रक्तपिण्याचे काम आपल्या राज्याचा कृषिमंत्री तपासणी पथकाचा बनाव करीत करीत असेल तर हे या राज्याचे दुर्दैव आहे. काही महिन्यांपूर्वी सिल्लोड कृषी महोत्सवाच्या नावावर राज्यातून कोट्यवधी रुपये अधिकाऱ्यांना जमा करण्याचे आदेश याच सत्तार यांनी दिल्याचा आरोप झाला होता. मंत्रिपदाचा उपयोग त्यातून मोठ्या प्रमाणावर पैसे काढण्यासाठी करताना अशी अनैतिक मशागत करणारा पहिलाच कृषिमंत्री या राज्याला बघावा लागत आहे हे महाराष्ट्राचे दुर्दैव आणि सरकारचा चुकलेला निर्णय आहे असे खेदाने म्हणावेसे वाटते. ऐन खरिपाच्या तोंडावर कीटकनाशके,खते अश्या कृषी निविष्ठा उत्पादक कंपन्यांवर धाडी पडतात मात्र त्यात शेतकरी हिट दडलेले असते जे यावेळी दिसून आले नाही. या पथकात अब्दुल सत्तार यांनी तब्बल ६ माणसे पद्धतशीरपणे घुसवली होती हे आता उघड झाले आहे. माध्यमांच्या हे लक्षात आल्यावर सत्तार याना नेमके उत्तर देता आले नाही.

व्यावसायिक जर शेतकऱ्यांची फसवणूक करीत असतील तर त्यांना अद्दल घडलीच पाहिजे यात कुणाचेही दुमत नाही मात्र शेतकरी हिताच्या आड आपली पोळी शेकून घेण्याचा अफलातून प्रयत्न अब्दुल सत्तत्तर यांनी केल्याचे या पर्यटनातून उघड झाल्याचे दिसत आहे. समजा हे तपासणी पथक कृषी अधिकाऱ्यांचे असेल तर त्यात मंत्र्यांचे पीए द्वीपक गवळी,ओएसडी प्रशांत ठाकरे ,संभाजी नगरचे माजी जिप अध्यक्ष आणि सत्तार यांचे समर्थक श्रीराम महाजन ,तसेच नागपूरचा हितेश भट्टड या सगळ्यांचा कसाकाय समावेश झाला याचे उत्तर कृषिमंत्री देऊ शकले नाहीत. सत्तार याना अकोल्यात पत्रकारांनी दीपक गवळी बाबत विचारले असता दीपक गवळी माझा पीए नाही तर कृषी अधिकारी आहे असे सत्तार म्हणाले. प्रत्यक्षात गवळी हा त्यांचा पीए असल्याचे त्यांच्या संभाजीनगर जिल्हा दौऱ्याच्या पत्रातून स्पष्ट झाले आहे. कृषिमंत्री धादांत खोटे बोलत असल्याचे सुद्धा उघड झाले आहे.

कृषी व्यावसायिकांना कारवाईची धमकी देऊन त्यांना मोठ्या रकमांची मागणी करण्यात आल्याची तक्रार अनेक व्यावसायिकांनी केली आहे. अश्या प्रकारच्या धाडी टाकण्यापूर्वी किमान सूचना देणे आवश्यक असताना या प्रकरणी नियमांची कोणतीही पूर्तता केल्याचे दिसत नाही.स्वतःची माणसे पथकात घुसवून पैश्याचे पीक घेणारा असा अफलातून कृषिमंत्री हा महाराष्ट्र प्रथमच बघत आहे. हे प्रकरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गंभीरतेने घेऊन तात्काळ सरकारला बदनामीचा असा डाग लावणाऱ्या अब्दुल सत्तार याना घरचा रस्ता दाखवायला हवा. जाऊ तिथे खाऊ अश्या प्रकारची काही माणसेराजकारणात असतात त्यांनीच यंत्रणा बदनाम करून ठेवल्या आहेत. अशी माणसे क्षणभर सुद्धा शिंदे यांच्या सेनेने पोसू नयेत नयेत. आगामी काळात ज्यांना डच्चू मिळणार आहे त्यात याच सत्तार यांचे नाव आहे आता या प्रकरणानंतर अश्या बदनाम कृषिमंत्र्याला घरचा रस्ता दाखविण्यावर सुद्धा शिंदे- फडणवीस यांनी शिक्कामोर्तब करायला हवे.

## संपादकीय »

### पहिले पाढे पंचावन्न

***आयसीसीच्या स्पर्धेच्या जेतेपदाचा दुष्काळ संपविण्याची संधी असतानाही भारताने जागतिक कसोटीच्या अंतिम लढतीच्या पूर्वतयारीकडे दुर्लक्ष केले. चेतेश्वर पुजारा सोडल्यास भारतीय संघातील खेळाडू आयपीएल खेळून कसोटी संघात आले होते.***

न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी जगज्जेतेपद लढतीपूर्वी हेच घडले होते. या कसोटीसाठी निवडलेल्या संघापासून गोंधळ लक्षात येत होता. त्या सामन्याप्रमाणेच संघनिवड चुकली होती. दोन्ही सामन्यांत भारतास एकतर्फी हार पत्करावी लागली होती. न्यूझीलंडविरुद्धच्या पराभवातून काही शिकल्याचे जाणवले नाही. 'दी ओव्हल'ला प्रथमच जूनमध्ये कसोटी खेळवली जात होती; पण भारतीय संघाने नवा विचार केला नाही. आयसीसीच्या स्पर्धेच्या जेतेपदाचा दुष्काळ संपविण्याची संधी असतानाही भारताने जागतिक कसोटीच्या अंतिम लढतीच्या पूर्वतयारीकडे दुर्लक्ष केले. चेतेश्वर पुजारा सोडल्यास भारतीय संघातील खेळाडू आयपीएल खेळून कसोटी संघात आले होते. त्याच वेळी ऑस्ट्रेलिया संघातील बहुतेक खेळाडू ताजेतवाने होते. जागतिक क्रिकेटमध्ये

**मध्य प्रदेशात २०२०-२१मध्ये २३.८ टक्के असलेले विद्यार्थी गळतीचे प्रमाण २०२१-२२मध्ये १०.१ टक्क्यांनी कमी झाले. उत्तर प्रदेशमधील आठ जिल्ह्यांमध्ये विद्यार्थी गळतीचे वार्षिक सरासरी प्रमाण खूपच जास्त आहे. राजस्थानमधील विद्यार्थी गळतीचे प्रमाण सातत्याने कमी होत आहे, परंतु अनुसूचित जमाती (नऊ टक्के) आणि मुस्लिम (१८ टक्के) मुलांनी शाळा सोडण्याचे प्रमाण माध्यमिक स्तरावर अजूनही खूप जास्त आहे.**

## महाराष्ट्रात शाळा सोडण्याचे प्रमाण घटले!

विद्यार्थ्यांनी शाळा सोडण्याचे प्रमाण महाराष्ट्रात घटले असल्याचे सरकारी आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी गळतीचे वार्षिक सरासरी प्रमाण २०२०-२१मध्ये ११.२ टक्के होते. ते २०२१-२२मध्ये १०.७ टक्के झाले आहे. तर, गुजरातसह सात राज्यांतील विद्यार्थी गळतीचे प्रमाण सरासरीपेक्षा (१२.६) अधिक असल्याचे या आकडेवारीवरून दिसते.

- २०२३-२४साठी 'समग्र शिक्षा' कार्यक्रमाच्या अंमलबजावणीवर चर्चा करण्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयांतर्गत आयोजित प्रकल्प मंजुरी मंडळाच्या (पीएबी) बैठकांच्या इतिवृत्तांतातून ही माहिती एकत्रित करण्यात आली आहे.

- यावर्षी मार्च ते मे दरम्यान राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसोबत या बैठका झाल्या.

- या माहितीनुसार, महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांमध्ये विद्यार्थी गळतीचे प्रमाण १५ टक्के आणि त्याहून अधिक आहे.

१०० टक्के नावनोंदणीचे उद्दिष्ट

-२०३०पर्यंत शालेय स्तरावर १०० टक्के एकूण



नावनोंदणी दराचे (जीईआर) नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे.

- हे उद्दिष्ट साध्य करण्यात शालेय विद्यार्थ्यांची गळती हा एक मोठा अडसर असल्याचे सरकार मानते, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

- युनायटेड नेशन्स चिल्ड्रन्स फंडच्या (युनिसेफ) गेल्या वर्षीच्या सर्वेक्षणात असे म्हटले होते की, भारतात ३३ टक्के मुली घरगुती कामांमुळे शाळा सोडतात.

-शाळा सोडल्यानंतर अनेक मुले आपल्या कुटुंबीयांसोबत मजूर म्हणून किंवा लोकांकडे घरकाम करू लागल्याचेही अनेक ठिकाणी आढळून आले.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# युतीला तडे जाण्याची भीती!

## शिंदेंच्या शिवसेनेची आता नवी जाहिरात; फडणवीसांना मानाचं पान

।मुंबई । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या वर्तमानपत्रात छापून आलेल्या जाहिरातीमुळे गदारोळ उडाला आहे. एका हिंदी वृत्तवाहिनीने केलेल्या सर्वेक्षणाचा आधार घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचा लोगो असलेली एक जाहिरात मंगळवारी प्रसिद्ध झाली होती. 'राष्ट्रामध्ये मोदी, महाराष्ट्रात शिंदे' या मथळ्याखाली छापून आलेल्या जाहिरातीतून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील भाजप नेतृत्वाला डिवचल्याची चर्चा सुरू झाली. कारण या जाहिरातीत महाराष्ट्र भाजपचं नेतृत्व करत असलेले राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा फोटोही नव्हता. त्यामुळे काही भाजप नेत्यांनी नाराजीही व्यक्त केली.**



त्यानंतर शिवसेना नेते आणि राज्याचे कॅबिनेट मंत्री शंभुराज देसाई यांना सारवासारव करत ही जाहिरात शिवसेनेनं दिलेली नसून आमच्या हितचिंतकांनी दिली असावी, असा खुलासा करावा लागला. सदर जाहिरातीमुळे युतीत तणाव निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जाऊ लागल्यानंतर आज शिंदे यांच्या शिवसेनेनं सावध भूमिका घेत नवी जाहिरात प्रकाशित करण्याचा निर्णय घेतल्याचं दिसत आहे. कारण आजच्या वर्तमानपत्रांमध्येही राज्य सरकारची लोकप्रियता दर्शवणाऱ्या सर्वेक्षणाचा आधार घेत जाहिरात देण्यात आली आहे. मात्र या जाहिरातीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह शिवसेनेच्या सर्व मंत्र्यांच्याही फोटो छापण्यात आला आहे.

एकनाथ शिंदे हे राज्यातील सर्वांत लोकप्रिय नेते असून मुख्यमंत्रिपदासाठी जनतेची सर्वाधिक पसंती त्यांनाच असल्याचा दावा 'झी न्यूज' या वृत्तवाहिनीने केलेल्या सर्वेक्षणात करण्यात आला होता. या सर्व्हेचा हवाला देत काल प्रकाशित करण्यात आलेल्या जाहिरातीत मुख्यमंत्री शिंदे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी या दोघांचाच फोटो छापण्यात आला होता. तसंच मुख्यमंत्रिपदासाठी शिंदे हे देवेंद्र फडणवीस यांच्यापेक्षाही अधिक लोकप्रिय असल्याचं दाखवण्यात आलं होतं. त्यामुळे भाजपमधून नाराजीचा सूर उमटू लागल्यानंतर आज व्यक्तीकेंद्री जाहिरात देण्याचं टाळून 'जनतेचा कौल शिवसेना-भाजप युतीलाच', असा उल्लेख करण्यात आला आहे.

### जाहिरातीत कोणाकोणाचे फोटो?

**»एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्रिपदासाठी सर्वाधिक लोकप्रिय असल्याचा दावा करणाऱ्या जाहिरातीत काल शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांचाही फोटो छापण्यात आला नव्हता. त्यावरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या नेत्यांनी मुख्यमंत्र्यांना लक्ष केल्यानंतर आजच्या जाहिरातीत बाळासाहेब ठाकरे यांच्यासह शिवसेनेचे दिवंगत नेते आनंद दिघे यांचाही फोटो छापण्यात आला आहे. सोबत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहादेखील या जाहिरातीत दिसत आहेत. तसंच एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांचा एकत्रित फोटोही या जाहिरातीत झळकत आहे.**

### 'डेंजर झोन'मधील मंत्र्यांनाही स्थान

**»राज्य मंत्रिमंडळाच्या संभाव्य विस्ताराच्या पार्श्वभूमीवर भाजप हायकमांडने एकनाथ शिंदे यांना त्यांच्या पक्षातील पाच मंत्र्यांची हकालपट्टी करण्याचे आदेश दिल्याची चर्चा रंगत आहे. मात्र आज वृत्तपत्रांमध्ये छापून आलेल्या जाहिरातीत शिवसेनेच्या या पाच मंत्र्यांसह इतरही मंत्र्यांचा फोटो छापण्यात आला आहे.**

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना १५०० कोटींची मदत मिळणार

## »अखेर खरिपापूर्वी राज्य सरकारचा मोठा निर्णय

। मुंबई । महाईन्यूज

**महाराष्ट्र सरकारनं गतवर्षी अवकाळी पावसामुळं झालेल्या नुकसानाबाबत शेतकऱ्यांना १५०० कोटी रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेततला आहे. या निर्णयाला काल झालेल्या राज्य मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.**



राज्यात गेल्या वर्षी झालेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना १ हजार ५०० कोटी रुपयांची मदत देण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला. सुमारे १५.९६ लाख हेक्टर बाधित क्षेत्रातील २७ लाख ३६ हजार शेतकऱ्यांना ही मदत देण्यात येणार आहे.राज्य सरकारने सततचा पाऊस ही नवीन आपत्ती घोषित करून मदत देण्याचा निर्णय ५ एप्रिलच्या मंत्रीमंडळ बैठकीत घेतला होता. त्याप्रमाणे शेतीपिकांच्या नुकसानीसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या सुधारित दराने आणि निकषानुसार मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारने राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचे दर सुधारित केले आहेत. त्यानुसार जिरायत पिकांच्या नुकसानीसाठी प्रति हेक्टर ८ हजार ५०० रुपये, बागायत पिकांच्या नुकसानीसाठी १७ हजार रुपये प्रति हेक्टर आणि बहुवार्षिक पिकांच्या नुकसानीसाठी २२ हजार ५०० रुपये प्रति हेक्टर अशी दोन हेक्टरच्या मर्यादेत ही मदत मिळेल.

# मुंबईतील प्रकल्पग्रस्तांच्या घरांचा प्रश्न मार्गी लागणार

। मुंबई । महाईन्यूज

मुंबईतील प्रकल्पग्रस्तांना पंतप्रधान आवास योजनेतून घरे देण्यात येतील, असे आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिले. तसे आदेश त्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. भाजप नेते आमदार अतुल भातखळकर यांनी त्यांच्या कांदिवली पूर्व विधानसभेतील विविध प्रश्नांबाबत उपमुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी झालेल्या बैठकीत विविध विषयांवर सविस्तर चर्चा झाली. त्यावेळी हे आश्वासन देण्यात आले. घराऐवजी २५ ते ४० लाख रुपयांचा पर्यायही प्रकल्पग्रस्तांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असे फडणवीस यांनी सांगितले. यावेळी भातखळकर यांनी मतदारसंघातील विविध प्रकल्पांमुळे विस्थापित होणाऱ्या नागरिकांचा प्रश्न



उपस्थित केला. विशेष नियोजन आराखड्यातील मागाठाणे-गोरेगाव या १२० फूट रस्त्याबाबतही चर्चा करण्यात आली. हा रस्ता आगामी एक ते दीड वर्षात पूर्ण करावा, असे आदेश त्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. हा रस्ता पूर्ण होताच वाहतूक कोंडीची समस्या सुटण्यास मदत होणार आहे.

भाजप आमदार अतुल भातखळकर यांच्या पुढाकारानं प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांबाबत चर्चा करण्यात आली. प्रकल्पग्रस्तांना पंतप्रधान आवास योजनेतून घरं देण्यात येतील असं उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. फडणवीस यांनी त्यासंदर्भात तसे आदेश देखील दिले आहेत. त्याचबरोबर प्रकल्पग्रस्तांना घरांऐवजी आर्थिक रक्कम हवी असल्यास त्यासंदर्भातील पर्याय देखील समोर ठेवण्यात आला आहे. प्रकल्पग्रस्तांना घरांच्याऐवजी २५ ते ४० लाख रुपयांची रक्कम देण्याबाबत पर्याय उपलब्ध करुन देण्यात येईल, असं फडणवीस यांनी सांगितलं.

# तीन वर्षांनंतरही सुशांत सिंहचे चाहते न्यायाच्या प्रतीक्षेत

अभिनेता सुशांत सिंह राजपूत यानं १४ जून २०२० रोजी जगाला अलविदा केलं. सुशांतच्या जाण्यानं जसा त्याच्या कुटुंबाला धक्का बसला तसाच धक्का त्याच्या लाखो चाहत्यांना बसला. सुशांत गेला आणि मागे असंख्य प्रश्न सोडून गेला. त्या प्रश्नांची उकल आजही झालेली नाही...

दिलखुलास व्यक्तीमत्व असलेल्या सुशांतनं आत्महत्य करण्याचा टोकाचा निर्णय का घेतला? असा प्रश्न सर्वांना पडला आहे. मृत्युपूर्वी सुशांतला कशाची चिंता भेडसावत होती असा प्रश्न आजही अनुत्तरीत आहे. मृत्यूआधी सुशांत नैराश्येच्या गर्तेत होता. तो नेमक्या कोणत्या कारणांमुळे निराश झाला होता? त्याच्या नैराश्याला नेमकं कोण कारणीभूत होतं असा प्रश्न आजही त्याच्यावर भरभरून प्रेम करणाऱ्या चाहत्यांना पडलेला आहे.



## हत्या की आत्महत्या?

सुशांतच्या कुटुंबाला आणि त्याच्यावर प्रेम करणाऱ्या चाहत्यांना तो असं काही टोकाचं पाऊल उचलेल यावर विश्वास नव्हता. त्यामुळे सुशांतनं आत्महत्या नाही तर त्याची हत्या झाल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला. त्यामुळेच आपल्या लाडक्या अभिनेत्याला न्याय मिळावा अशी त्याची चाहत्यांची इच्छा आहे. त्यामुळेच त्यांनी अनेक आंदोलन केली. सरकारनं देखील सुशांतची केस सीबीआयकडे सोपवली. त्यानंतर याप्रकरणातून एक ड्रग्ज प्रकरण उघडकीस आलं.

## 14 जून 2020 हा काळा दिवस

सुशांतनं १४ जून २०२० रोजी मुंबईतील त्याच्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. पोलिसांना या घटनेची माहिती देणाऱ्यांनी आणि प्राथमिक तपास करणाऱ्या पोलिसांनी ही आत्महत्या असल्याचं सुरुवातीला सांगितलं.. ही बातमी वाऱ्यासारखी पसरली. त्यानंतर या तपासावर प्रश्न चिन्ह चाहत्यांनी उपस्थित केलं. सुशांतच्या वडिलांनीही याप्रकरणाचा सीबीआय तपास करावा अशी मागणी केली. याशिवाय अनेक राजकीय मंडळींनी ही हत्या असल्याचा दावा करत सीबीआय तपासाची मागणी केली.

# विनोदी लिहिणारे लेखकच नाहीत; ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांची खंत

केदार शिंदे दिग्दर्शित 'बाईपण भारी देवा' या चित्रपटाची पहिली झलक आज समारंभपूर्वक प्रकाशित करण्यात आली. यावेळी अशोक सराफ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विनोदी अभिनयाची हुकूमी जाण असलेले कलावंत म्हणून अशोक सराफ यांचा लौकिक आहे. गेल्या पाच दशकांहून अधिक काळ चित्रपट आणि रंगभूमीवर कार्यरत असलेल्या अशोक सराफ यांनी विविधांगी भूमिका केल्या आहेत. मात्र त्यांच्या विनोदी भूमिका आजही प्रेक्षकांच्या मनात कायम आहेत. हीच गोष्ट लेखकांच्या बाबतीतही अनुभवाला येते असे त्यांनी सांगितले. 'नवोदित लेखकांसाठी आजही मी विनोदी भूमिका साकारणारा नट आहे, परंतु त्यापलिकडेही मी विविध भूमिका साकारू शकतो अशी खात्रीच काही लेखकांना वाटत नाही असे जाणवते. माझ्या वयानुरुप आणि विनोदी



अंगाने विचार करून लिहिणारे लेखक नाहीत याचीच खंत वाटते', अशा शब्दांत त्यांनी सध्या चित्रपटांपासून लांब राहण्यामागचे कारण स्पष्ट केले.

मराठीत विनोदीपट जास्त दिग्दर्शित केले जात नाहीत. तशा प्रकारचे सकस विनोदी लेखनच होत नाही. विनोदाच्या नावाखाली ज्या संहिता लिहिल्या जातात त्याला विनोद म्हणणे म्हणजे स्वत:चीच फसवणूक करण्यासारखे आहे, अशा कडक शब्दांत त्यांनी आपली नाराजी व्यक्त केली. चांगल्या पटकथाच मिळत नसल्याने सध्या तरी चित्रपटांपासून दूर आणि रंगभूमीच्या अधिक जवळ असल्याचे सांगत सध्या रंगभूमीवर गाजत असलेल्या 'व्हॅक्युम क्लीनर' या नाटकाने पावणेचारशे प्रयोगांचा टप्पा गाठल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

# 'दंगल' गर्लला या कारणामुळे सोडायचा होता अभिनय

फातिमा सना शेखने 2016 साली 'दंगल' चित्रपटात उत्कृष्ट अभिनय केला होता. या चित्रपटात ती गीता फोगटच्या भूमिकेत दिसली होती. फातिमा सना शेख 11 जानेवारीला तिचा वाढदिवस साजरा करत आहे. आज फातिमा 31 वर्षांची झाली आहे, त्यामुळे आज आम्ही तुम्हाला 'दंगल गर्ल'च्या आयुष्याशी संबंधित काही रंजक गोष्टी सांगणार आहोत. फातिमा सना शेख काश्मीरमधील मुस्लिम कुटुंबातील आहे. तिच्या वडिलांचे नाव विपिन शर्मा आणि आईचे नाव राज तबस्सुम आहे.

जर तुम्हाला वाटत असेल की 'दंगल' हा फातिमा सना शेखचा पहिला चित्रपट आहे तर तुम्ही चुकीचे आहात. तुम्हाला सांगतो, फातिमा पहिल्यांदा 1997 मध्ये आलेल्या 'चाची 420' चित्रपटात बालकलाकार म्हणून दिसली होती. यानंतर ती 'वन टू का फोर' या चित्रपटातही दिसली.

मात्र, या चित्रपटानंतर ती 15 वर्षे चित्रपटांपासून दूर राहिली. फातिमा सना शेखने छोट्या पडद्यावरही काम केले आहे. तिने 'बेस्ट ऑफ लक निक्की', 'लेडीज स्पेशल' आणि 'अगले जनम मोहे बिटिया ही कीजो' सारख्या टीव्ही शोमध्ये काम केले आहे. अभिनेत्रीने दक्षिण भारतीय चित्रपटांमध्येही काम केले आहे. मात्र, अपेक्षित यश न मिळाल्याने तिला अभिनय सोडायचा होता.





# अण्णांची शेवंता दिसणार मांजरेकरांच्या चित्रपटात..

बिग बॉसचा सीजन संपला असला तरी या शोची चर्चा काही थांबयला मागत नाहीय. 100 दिवस या घरात जिच्या आवाजाने दणका उठवला होता अशी हर हुन्नरी अपूर्वा नेमळेकर बाबत आता एक मोठी बातमी समोर आली आहे. या खेळात शेवटच्या दोन स्पर्धकांपैकी ती एक ठरली. तिला या खेळात विजेतेपद मिळालं नसलं तरी त्यापेक्षा मोठी गोष्ट तिने कमवली आहे. याविषयीच तिने मुलाखतीत सांगितले आहे. मी जे बोलते ते मि करूनच दाखवते म्हणणाऱ्या लेडी ऑफ वर्डस्.. अपूर्वा यंदा बिग बॉसच्या घरातील सर्वाधिक मनोरंजन करणारी स्पर्धक ठरली.

अपूर्वाची 'रात्रीस खेळ चाले' या मालिकेतील शेवंता भूमिकेमुळे जनमानसात आधीपासूनच क्रेझ होती. ती या खेळाने अधिकच वाढवली. अपूर्वाचा खेळ आणि स्पष्ट, रोखठोक वागणूक पाहून अपूर्वाच विजेती होणार असे सर्वांना वाटले होते, पण तसे झाले नाही. या खेळात अक्षय केळकर ने बाजी मारली.

# धोनीला मीडियाने हिरो बनवला!

## गंभीरने जहरी टीका करत सांगितले विश्वविजयाच्या नायकाचे नाव

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**महेंद्रसिंग धोनीने भारताला विश्वचषक जिंकवून दिला नाही तर वर्ल्ड कपचा हिरो वेगळाच आहे. धोनीवर टीका करत गौतम गंभीरने कोणाला विश्वचषकाचा हिरो असल्याचे सांगितले आहे : भारताने WTC FINAL गमावली आणि त्यानंतर काही जणांनी महेंद्रसिंग धोनीची स्तुती करायला सुरुवात केली. पण धोनीची स्तुती करणाऱ्या या सर्वांना आता भारताचा माजी सलामीवीर गौतम गंभीरने चांगलीच चपराक दिली आहे. .**



त्याचबरोबर धोनीला मीडियाने हिरो बनवला पण विश्वविजयाचा नायक मात्र वेगळाच आहे, असे गंभीरने यावेळी स्पष्ट केले.

गंभीर यावेळी म्हणाला की, " धोनीला मीडियाने मोठा केला आहे. त्यामुळे ज्या खेळाडूने भारताला विजय मिळवून दिले, त्यांचे नाव पुढे येत नाही. फक्त धोनीचेच नाव विजयानंतर घेतले जाते. एका जनसंपर्क टीमने धोनीला हिरो बनवले आहे. कारण जेव्हा जेव्हा २००७ किंवा २०११ च्या विश्वचषकाचा विषय काढला जातो, तेव्हा धोनीनेच नाव घेतले जाते. कारण या जनसंपर्क टीमने धोनीच्या नावाची एवढी जाहीरात केली की लोकांच्या डोक्यात जेव्हा विश्वविजयाची गोष्ट येते तेव्हा फक्त धोनीचेच नाव समोर येते, पण हा विश्वचषक जिंकवून देणाऱ्या खेळाडूला मात्र तेवढी प्रसिद्धी नक्कीच मिळालेली नाही. त्यामुळे जो खरा हिरो आहे त्याच्यावर अन्याय झाला आहे."

गंभीरने पुढे सांगितले की, " भारताच्या २००७ आणि २०११ या विश्वविजयाचे श्रेय युवराज सिंगला द्यायला हवे. कारण या दोन्ही विश्वविजयांचा तो नायक होता. पण दुर्दैवाने मला सांगावे लागते की, जेव्हा २००७ आणि २०११ च्या विश्वचषकाचा विषय निघतो तेव्हा कुठेच युवराजचे नाव आघाडीवर येत नाही. कारण ही गोष्ट मार्केटींगमुळे झाली आहे. जनसंपर्क टीमने धोनीचे एवढे मार्केटींग केले की त्याने एकट्यानेच विश्वचषक भारताला जिंकवून दिले, असे चाहत्यांच्या मनावर बिंबवण्यात आले आहे. कोणताही संघ कधीच एकट्या खेळाडूच्या जोरावर जिंकत नाही. त्यामुळे विश्वविजयासाठी जे फक्त धोनीचे नाव घेतले जाते, ते साफ चुकीचे आहे."

विश्वविजय म्हटलं की काही

### युवराज विश्वचषकाचा खरा हिरो : गंभीर



» गंभीर म्हणाला की, “2011 च्या विश्वचषकात युवराज सिंग प्लेअर ऑफ द सिरीज होता आणि शाहिद आफ्रिदीने 2007 च्या T20 वर्ल्ड कपमध्ये प्लेअर ऑफ द टूर्नामिंटचा पुरस्कार जिंकला होता. पण आमचे दुर्दैव हे आहे की जेव्हा आपण 2007 आणि 2011 च्या वर्ल्ड कपबद्दल बोलतो तेव्हा आपण युवराज सिंगचे नाव घेत नाही. असे का? कारण हा फक्त पीआर आणि मार्केटिंग टीमचा खेळ आहे, जिथे फक्त एका व्यक्तीला मोठं केलं जातं आणि इतरांना लहान केलं जातं.” गंभीर पुढे म्हणाला की, “कुणीही लहान नसतो. हा फक्त पीआर आणि मार्केटिंगचा खेळ आहे. केवळ एकाच व्यक्तीमुळे आम्ही 2007 आणि 2011 ला वर्ल्ड कप चॅम्पियन बनलो असे आम्हाला वारंवार सांगितले जाते. पण, त्यात संपूर्ण संघाचे योगदान होते. कोणताही एकच खेळाडू तुम्हाला मोठी स्पर्धा जिंकून देऊ शकत नाही. असेच राहिले असते, तर भारताने 5-10 विश्वचषक जिंकले असते.” भारतात संघाचे नाव आधी घेतले जात नाही, असेही गंभीर म्हणाला. “उलट इथे एका खेळाडूला सर्वात पुढे ठेवले जाते आणि त्यामुळेच अनेक वर्षांपासून आम्ही आयसीसी स्पर्धा जिंकू शकलेलो नाही. बरेच लोक माझ्याशी सहमत होणार नाहीत, पण हे सत्य आहे.”

---

## सीनियर खेळाडूंचा पत्ता कट! वेस्ट इंडिज दौऱ्यात युवांना मिळणार संधी



। पॅरिस।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीपच्या फायनल सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून टीम इंडियाचा 209 धावांनी लाजीरवाणा पराभव झाला. या पराभवानंतर आता टीम इंडियाच्या सीनियर खेळाडूंचा पत्ता कट होणार आहे. कारण वेस्ट इंडिज दौऱ्यावर आता बीसीसीआय़ युवा खेळाडूंना पाठवण्याची तयारी करते आहे. त्यानुसार आता वेस्ट इंडिज विरूद्धच्या सामन्यात आयपीएल 2023मध्ये सर्वोत्कृष्ठ कामगिरी केलेली खेळाडू दिसण्याची शक्यता आहे. या खेळाडूंमध्ये यशस्वी जायसवाल, रिंकू सिंह, सरफ़राज खान आणि वेगवान गोलंदाज मुकेश कुमार यांना संधी मिळण्याची शक्यता आहे.

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीपमधील पराभवानंतर टीम इंडिया एका महिन्याच्या विश्रांतीवर आहे. यानंतर जुलै महिन्यात टीम इंडिया वेस्ट इंडिज दौऱ्यावर असणार आहे.या दौऱ्यात 2 टेस्ट, 3 वनडे आणि 5 टी20 सामने खेळवले जाणार आहेत. या दौऱ्यासाठी टीम इंडियाच्या युवा खेळाडूंना संधी मिळण्याची शक्यता आहे. टी20 सीरीज बद्दल बोलायचं झालं तर, संघाचे कर्णधारपद हार्दिक पंड्याकडे सोपवले जाण्याची शक्यता आहे. तर आयपीएलमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या यशस्वी जायसवाल आणि रिंकु सिंहची टी20 संघात निवड होऊ शकते.

# भारताकडून हाँगकाँगचा धुव्वा

## उदयोन्मुख महिला आशिया चषक क्रिकेट

। मोन्ग कोक (हाँगकाँग) ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**अमेरिकेची श्रेयंका पाटीलच्या (दोन धावांत पाच बळी) उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर भारतीय संघाने मंगळवारी हाँगकाँगचा नऊ गडी आणि ८८ चेंडू राखून धुव्वा उडवत उदयोन्मुख महिला आशिया चषक ट्वेन्टी-२० क्रिकेट स्पर्धेची विजयी सुरुवात केली. प्रथम फलंदाजी करणाऱ्या हाँगकाँगला १४ षटकांत ३४ धावांत गुंडाळल्यानंतर भारताने हे लक्ष्य ५.२ षटकांतच एका गड्याच्या मोबदल्यात गाठले. कर्णधार श्वेता सेहरावत (२) लवकर बाद झाली. मात्र, उमा छेत्री (१५ चेंडूंत नाबाद १६) आणि त्रिशा गोंगडी (१३ चेंडूंत नाबाद १९) यांनी भारताला विजय मिळवून दिला.**

त्यापूर्वी, ऑफ-स्पिनर श्रेयंकासमोर हाँगकाँगची फलंदाजी फळी ढेपाळली. महिला प्रीमियर लीगच्या (डब्ल्यूपीएल) पहिल्या पर्वात रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुकडून चमकदार कामगिरी करणाऱ्या २० वर्षीय श्रेयंकाने अचूक टप्प्यावर मारा करताना हाँगकाँगचा निम्मा संघ गारद केला. तिला डावखुरी फिरकी गोलंदाज मन्नत कश्यप (२/२) आणि लेग-स्पिनर पार्शवी चोप्रा (२/१२) यांची मोलाची साथ लाभली.

उदयोन्मुख महिला आशिया चषकातील भारताचा पुढील सामना गुरुवारी नेपाळविरुद्ध होणार आहे.

